# (6) प्राकृत संधी

**प्रस्तावना –**

प्रत्येक भाषेच्या व्याकरणामध्ये संधीस महत्त्वपूर्ण स्थान असलेले दिसून येते. संधीमुळे शब्दांचे आकार संक्षिप्त होण्यास मदत होते. तर संधी विग्रहामुळे शब्दोच्चारास सुलभता येते. संधी नियमानुसार संधीचे 1) स्वरसंधी 2) प्रकृतिभावसंधी 3) उद्‌वृत्तस्वरसंधी 4) अव्ययस्वरसंधी 5) व्यंजनसंधी असे पाच प्रकार (विभाग) पडतात.

संस्कृत भाषेत दोन स्वर किंवा एक स्वर, एक व्यंजन किंवा व्यंजन – व्यंजन एकत्रित आले तरीही संधी होतो. तसेच विसर्ग आणि स्वर किंवा व्यंजन, एकत्रित आले तरीही संधी होतात.

अर्धमागधी प्राकृतात विसर्ग नसल्याने प्राकृतात विसर्गसंधी येत नाही. तसेच प्राकृत ही बोलीभाषा असल्याने व सुलभीकरण हे बोलीभाषेचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याने संस्कृतप्रमाणे प्राकृतात बऱ्याच ठिकाणी संधी होतोच असे नाही. प्राकृतात थोडीफार शिथिलता असलेली दिसून येते म्हणून प्राकृतातील सर्व संधीनियमाचा परिचय असणे आवश्यक आहे.

## स्वर संधी

स्वर संधीचे 1) दीर्घ संधी 2) गुण संधी (3) ऱ्हस्व संधी (4) संधी निषेध (5) स्वरलोप संधी इ. प्रकार आहेत.

**1) दीर्घसंधी –** (अ) दोन सजाती स्वर एकत्र आले असता त्यांचे दीर्घ स्वरांमध्ये रूपांतर होते. म्हणजेच अ अथवा आ स्वरापुढे अ किंवा आ हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'आ' (दीर्घ) मध्ये होते. (अ + अ = आ/ आ + आ = आ)

| | | |
|---|---|---|
| जीव + अजीव = जीवाजीव | इह +आगमण = इहागमण | गाम +अणुग्गाम = गामाणुग्गाम |
| कला + आयरिय = कलायरिय | रयण +आगरो = रयणागरो | तहा + अवि = तहावि |
| राया + अभिसेओ = रायाभिसेओ | जहा + अवि = जहावि | दुह + आवहा = दुहावहा |
| जिण + आलय = जिणालय | धम्म + अधम्म = धम्माधम्म | गण + अहिवइ = गणाहिवइ |
| विज्जा + आलय = विज्जालय | | |

**अ + आ = होतो, परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरांच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर असेल तर त्याचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व (अ) स्वरातच रूपांतर होते.**

| | | |
|---|---|---|
| भिक्ख + अट्‌ठा = भिक्खट्‌ठा | दव + अग्गि = दवग्गि | जीविय + अट्‌ठा = जीवियट्‌ठा |
| जम्म + अंतर = जम्मंतर | न + अत्थि = नत्थि | रत्त + अच्छ = रत्तच्छ |
| मरण + अंतर = मरणंतर | कोह + अग्गि = कोहग्गि | |

**(ब) इ अथवा इ च्या पुढे इ किंवा ई आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ ई मध्ये होते.**

उदा. मुणि + इसर = मुणीसर नंदी + इसर = नंदीसर पुहवी + इसर = पुहवीसर

मुणि + इणो = मुणीणो दहि + इसर = दहीसर कवि + ईसर = कवीसर

लच्छी + इसरो = लच्छीसरो

**ई + ई = ई होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वराच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर आले तर त्यांचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व (इ) च होईल.**

उदा. मुणि+ इन्द = मुणिन्द, कवि + इन्द = कविन्द, महि + इन्द = महिन्द

**(क) उ अथवा ऊ या स्वरापुढे उ किंवा ऊ हे स्वर आले असता त्या दोन्ही (क) स्वरांचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरामध्येच होते.**

उदा. साहू + ऊसव = साहूसव वहू + ऊसव = वहूसव

महू + ऊसव = महूसव बहू + उदगं = बहूदगं

धेणु + ऊसव = धेणूसवो बहू + उवयार = बहूवयार

**उ + ऊ = ऊ होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरापुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरात न होता ऱ्हस्व स्वरात होते.**

उदा. साहू + उत्तम = साहुत्तम

दुरू + उज्झिया = दुरुज्झिया

**2) गुणसंधी – (अ) अ अथवा आ या स्वरांच्यापुढे 'इ' किंवा 'ई' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ए' मध्ये होते.**

उदा. राया + इसी = राएसि जहा + इव = जहेव महा + इसि = महेस

नर + इसर = नरेसर तेण + इव = तेणेव दम + इसर = दमेसर

इह + इव = इहेव खय + ईसर = खयरेसर

**अ+इ = ए होतो परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरांच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर त्याचे रूपांतर 'ए' मध्ये न होता ऱ्हस्व (इ) स्वरामध्ये रूपांतर होते.**

उदा. नर + इंद = नरिंद (नरेंद) न + इच्छइ = निच्छइ (नेच्छइ)

महा + इंद = महिंद (महेंद) जह + इच्छइ = जहिच्छइ

सुर + इन्द = सुरिंद चरण + इंधण = चरणिंधण देव + इन्द = देविंद

महा + इड्ढिय = महिड्ढिय जिण + इन्द = जिणिंद

**ब) अ अथवा आ या स्वरांच्या पुढे 'उ' अथवा 'ऊ' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ओ' मध्ये होते.**

उदा. तस्स + उवरि = तस्सोवरि

किस + उयरी = किसोयरी

जहा + उइयं = जहोइय

महा + उवयार = महोवयार

महा + ऊसव = महोसव

जहा + उचिय = जहोचिय

एग + ऊण = एगोण

नीसास + उसास = नीसासोसास

मास + उववास = मासोववास

**अ + उ = ओ होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरांच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर 'ओ' न होता ऱ्हस्व (उ) स्वरात रूपांतर होते.**

उदा. नयर + उज्जाण = नयरुज्जाण

पुरिस + उत्तम = पुरिसुत्तम

रयण + उज्जल = रयणुज्जल

कुल + उब्भव = कुलुब्भव

तेण + उत्तं = तेणुत्तं

भय + उव्विग = भयुव्विग

सव्व + उत्तम = सव्वुत्तम

रत्त + उप्पल = रत्तुप्पल

**क) अ अथवा आ या स्वरांच्या पुढे 'ए'हा स्वर आल्यास त्याचे रूपांतर 'ए' मध्येच होते.**

| | | |
|---|---|---|
| उदा. जहा + एव = जहेव | च + एव = चेव | तहा + एव = तहेव |
| इह + एव = इहेव | एग + एग = एगेग | केण + एव = केणेव |
| न + एव = नेव | एक + एक = एकेक | |

**केव्हा केव्हा पहिल्या शब्दातील शेवटच्या वर्णावर अनुस्वार असेल तर प्रथम त्याचा 'म'बदल करून नंतर संधी नियमानुसार संधी केला जातो.**

| | | |
|---|---|---|
| उदा. एगं + एगं = एगमेगं | किं + एत्थ = किमेत्थ | एक्कं+ एक्कं = एक्कमेक्कं |
| तं + आसन्ने = तमासन्ने | किं + एस = किमेस | जुत्तं + एमं = जुत्तमेयं |
| तं + एव = तमेव | एवं + आइ = एवमाइ | जं + एव = जमेव |
| विवेगं + एउं = विवेगमेउं | अन्नं + अन्न = अन्नमन्न | |

**3) स्वरलोपसंधी – केव्हा केव्हा संधी करतेवेळी दुसऱ्या शब्दातील प्रथम स्वराचा लोप होऊन 'य, र, म' या बाह्य वर्णाचे आगमन होऊन संधी केला जातो. याला स्वरलोप संधी म्हणतात.**

अ) 'र' आगमन संधी

| | | |
|---|---|---|
| धि + अत्थु = धिरत्थु | पुण + अवि = पुणरवि | नि + अंतर = निरंतर |
| दु + चारिणी = दुराचारिणी | नि + आनंद = निराणंद | दु + अंगुल = दुरंगल |
| नि + अणुकंपा = निराणुकंपा | चउ + अंगुलं = चउरंगुल | नि + उपमा = निरुपमा |

ब) 'य' आगमन संधी

दु + अंगुल = दुयंगुल     त + अणंतर = तयणंतर     त + आसन्ने = तयासन्ने

क) 'म' आगमन संधी

भवइ + आइणो = भवइमाइणो

## 4) अव्यय स्वर संधी - अव्ययापूर्वी स्वर आल्यास त्याचा लोप होतो.

केण + अपि = केणावि, केण वि,     (केणपि येथे 'अ' चा लोप झाला.)

किं + अपि = किमवि, किं पि     सुयणा + अपि = सुयणा वि

तं + अपि = तं पि     पुरिसो + इति = पुरिसो त्ति

पढमं + इति = पढमं ति     दिट्ठं + इति = दिट्ठं ति

किं + इति = किं ति     तहा + इति = तहत्ति

दीसइ + इति = दीसइ त्ति     नत्थि + इति = नत्थि त्ति

दिटठं + इति = दिटठं ति

## 5) द्‌वित्व संधी - केव्हा केव्हा दुसऱ्या शब्दातील पहिल्या वर्णाचे द्‌वित्व करून संधी केला जातो.

त + कम्म = तक्कम्मं     स + भिक्ख = सब्भिक्ख

नि + करुणा = निक्करुणा     त + खणं = तक्खणं

जाव + जीव = जावज्जीव     दु + जणो = दुज्जणो

नि + नेह = निन्नेह/निण्णेह

❍❍❍